# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** क्रांति चौक
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0035 **Year (वर्ष):** 2026
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**25/02/2026 21:55

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिंनाक पासून):** 25/02/2026
      **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 25/02/2026
      **Time From (वेळेपासून):** 13:42 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 13:42 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिंनाक ):** 25/02/2026 **Time (वेळ):** 21:43 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 040
   **Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 25/02/2026 21:43 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** जिल्हा परिषद कार्यालय गेट समोर,छत्रपती संभाजीनगर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): चैनसिंग सांडुसिंग गुसिंगे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,छत्रपती संभाजीनगर ,शहर चौक,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,छत्रपती संभाजीनगर ,शहर चौक,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9823018740

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नंदकिशोर आसाराम चव्हाण | | | 1. नवकार यश कमप्लक्स सी-वींग,,प्लट क्र13, पोलीस कलनीपडेगाव ,छत्रपती संभाजीनगर,क्रांति चौक,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिंयाद दि 25/02/2026.

मी चैनसिंग सांडुसिंग गुसिंगे, वय 45 वर्ष, व्यवसाय नोकरी, पोलीस निरिक्षक लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मो.नं. 9823018740.
मी सरकार तर्फे फिंयादी होवुन फिंयाद देतो की, मी वरील प्रमाणे असुन मागील दिड वर्षापासुन छत्रपती संभाजीनगर येथे पोलीस निरिक्षक म्हणुन नेमणुकीस आहे. दिंनाक 24/02/2026 रोजी मा.पोलीस उप-अधिक्षक लाचलुचपत प्रतिंबधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी आम्हाला आदेशीत केले की, एक तक्रारदार असुन त्याची तक्रार सविस्तर ऐकुण घ्यावी व त्यावर नियमानुसार कायदेशीर कारवाई करावी, मा.पोलीस उप-अधिक्षक ला.प्र.वि छत्रपती संभाजीनगर यांचे आदेशानुसार आम्ही प्रथम तक्रारदार व त्यांचे सोबत असलेली व्यक्ती यांना आमच्या कक्षा मध्ये बोलावुन त्यांची तोंडी तक्रार ऐकुन घेतली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना सांगितले की, तुमच्या सोबत असलेली तुमचे मित्र श्री विशाल बनसोड व तुमचे एकच प्रकरण आहे, तेव्हा तुमच्या दोघापैकी एकाने तक्रार दयावी, तुम्ही तुमची लेखी तक्रार दोन शासकीय पंचासमक्ष दया असे सांगुन दोन शासकीय पंचांची सेवा उपलब्ध करून घेतली व दोन शासकीय पंचा समक्ष तक्रारदार श्री.अब्रार नसीर पटेल, वय 21 वर्ष, व्यवसाय व्यापार, रा- मदिना कॉलोनी नवीन तहसील कार्यालय समोर, फुलंब्री ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर, यांची लेखी तक्रार त्यांच्या हस्ताक्षरात घेतली. तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, मी अब्रार नसीर पटेल, वय 21 वर्ष, व्यवसाय व्यापार, रा- मदिना कॉलोनी नवीन तहसील कार्यालय समोर, फुलंब्री ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर, समक्ष लाचलुचपत प्रतिंबधक विभाग (ACB) छत्रपती संभाजीनगर येथे DYSP साहेब यांच्याकडे हजर येऊन माझ्याकडे होणाऱ्या लाच मागणी संदर्भाने सांगीतले असता त्यांनी माझी भेट PI गुसिंगे साहेब यांच्यासोबत करून दिली व माझी तक्रार नोंदविण्याबाबत सांगितले. त्यावरून मी PI गुसिंगे साहेब यांच्या समक्ष माझ्या हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली की, माझे फलंब्री तहसिल कार्यालय जवळ जनसेवा केंद्र नावाचे झेरॉक्स दुकान आहे. त्यापुर्वी मी व माझा मित्र विशाल गणेश बनसोड रा.फुलंब्री ता.फुलंब्री असे आम्ही कौशल्य विकास व्होकेशनल ट्रेनिग सेंटर हिवरा ता.फलंब्री येथे कंस्ट्रक्शन सुपरवाझर हा कोर्स सन- 2025 यावर्षी पुर्ण केला आहे. सदर कोर्सच्या आधारावर मला व माझ्या मित्राला जिल्हा परिषद परिषद अंतर्गत बांधकाम विभागामाफत निघणारे शासकीय कामे यांची गुत्तेदारी/ठेकेदार मिळणेकरीता जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर बांधकाम विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र (वर्ग -7) मिळणे करीता मी व माझा मित्र विशाल बनसोड दोघांनी दिनाक 01/01/2026 रोजी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथील बांधकाम विभागात "Annexure C" हा अर्ज भरून त्या सोबत संबंधीत कार्यालयाने सांगितल्याप्रमाणे (Bank -DD) , प्रतीज्ञापत्र, बँक पासबुक, रहिवाशी व Nationality प्रमाणपत्र, आधार कार्ड, प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र, सॉलव्हनसी, व इतर कागदपत्र आवक - जावक दिले होते. आज दिंनाक 24/02/2026 रोजी मी व माझा मित्र विशाल बनसोड आम्ही दिलेल्या बांधकाम ठेकेदार /गुत्तेदार नोंदणी प्रामणपत्र (वर्ग -7 ) मिळणे करीता जिल्हा परिषद कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयात गेलो असता, आम्हाला यापुर्वीआमच्या कामासंदर्भाने भेटलेले तसेच आम्हा दिलेल्या अर्जाची त्रुटींची पुर्तता करून घेणारे श्री.चव्हाण साहेब त्यांच्या कार्यालयात भेटले होते. तेव्हा मी व माझ्या मित्रानी आमच्या नोंदणी प्रमाणपत्र फाईल संदर्भाने विचारपुस केली असता त्यांनी त्यांच्या टेबलवरील आमच्या



Scanned with OKEN Scanner

फाईल पाहुण चर्चा करून आम्हाला कार्यालयाच्या बाहेर घेऊन आले त्यानंतर श्री.चव्हाण साहेब यांनी मला व माझा मित्र विशाल बनसोड यांना जिल्हा परिषद कार्यालय बांधकाम विभाग येथुन ठेकेदार नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी शासकीय फिस व्यतिरिक्त दोन्ही फाईलचे प्रत्येकी 7000/- हजार रूपये याप्रमाणे पैशाची मागणी केली आहे. परंतु आम्हाला त्यांना पैसे/लाच देण्याची इच्छा नाही मी व माझा मित्र विशाल बनसोड आमच्या कामा संदर्भाने उदया परत श्री.चव्हाण साहेब यांना भेटण्यासाठी जाणार आहे. त्यांनी आम्हाला आमच्या कामा संदर्भाने/लाचेची मागणी केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी. मी. व मित्र विशाल बनसोड यांचे श्री.चव्हाण यांच्या सोबत पुर्वीचा कोणताही उसनवारी/पैशाचा व्यवहार नाही. अगर आमची त्यांच्यासोबत वैर अथवा भांडण नाही. माझी वरील तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरात स्वता: लिहली असुन ती बरोबर व खरी आहे. तक्रारदार यांनी सोबत जिल्हा परिषद बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचे कामासाठी दिलेली फाईलची झेरॉक्स प्रत दिली आहे. अशी लेखी तक्रार दिल्याने पंचांची खात्री झाल्यावर पंचांनी व आम्ही त्यावर सह्या केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रादार श्री अब्रार पटेल, यांनी दिलेल्या तक्रारी प्रमाणे उदईक रोजी तक्रारदीचे अनुषंगाने लाचमागणी पडताळणी करणे असल्याने तक्रारदार श्री.अब्रार पटेल, त्यांचे मित्र विशाल बनसोड, पंच व सापळा पथक यांना आमचे कार्यालयात दिंनाक 25/02/2026 रोजी सकाळी 10.00 वाजता बोलावले. तसेच तक्रारदार श्री. अब्रार पटेल त्यांचे मित्र विशाल बनसोड, दोन शासकीय पंच व नेमलेले सापळा पथक यांना सदर बाबत गुप्तता राखणे बाबत सांगीतले.

त्यानंतर तक्रारदार श्री.अब्रार पटेल, त्यांचे मित्र विशाल बनसोड, पंच व सापळा पथकातील सदस्य हे आम्ही दिंनाक 24/02/2025 रोजी सांगितल्या प्रमाणे दिंनाक 25/02/2026 रोजी आमच्या कक्षात हजर आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिंनाक 25/02/2026 रोजी जिल्हा परिषद कार्यालय बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर येथे तक्रारदार यांना त्यांच्या कामासाठी अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण हे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत तक्रारदार व त्यांचे मित्र श्री विशाल बनसोड तसेच पंच क्रमांक 1. श्री.सोमेश्वर नरबदे यांना जिल्हा परिषद कार्यालय बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निणय तक्रारदार, शासकीय पंचा व सापळा पथक पो.अं नंदिले पो.अं बारसे यांचे समक्ष घेतला. त्यानंतर आम्ही दोन शासकीय पंच,सापळा पथक असे खाजगी वाहन क्रमांक एम.एच.20 डि.व्ही. 2001 या चारचाकी वाहनाने तसेच तक्रारदार व त्यांचे मित्र विशाल बनसोड हे त्यांचे कडील मोटार सायकल क्रमांक MH-20 HA-6484 ने लाचलुचपत प्रतिंबधक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथुन सुमारे 10.45 वाजता जिल्हा परिषद कार्यालय बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर जवळील सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी रवाना झालो. जिल्हा परिषद कार्यालय बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर जवळील सुरक्षीत ठिकाणी पोहचल्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.अब्रार नसीर पटेल व त्यांचे मित्र विशाल बनसोड यांना व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. आमच्या सुचनेवरुन पो.अ नंदिले यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये SanDisk कंपनीचे 16 जी.बी क्षमतेचे नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांच्या गळयात सुरक्षीत अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्री.अब्रार पटेल व पंच क्रमांक-1 श्री.सोमेश्वर नरबदे यांना जिल्हा परिषद कार्यालय बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर येथे अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचे कडील मोटार सायकल क्रमांक MH-20 HA-6484 ने 11.30 वाजता रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व त्यांचे मित्र विशाल बनसोड व पंच क्रमांक -1 श्री.सोमेश्वर नरबदे हे 11.52 वाजेच्या सुमारास अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण यांची भेट घेऊन आम्ही थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी परत आले. आमच्या सुचनेवरुन पो.शि/नंदिले यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन आमच्या ताब्यात दिले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार, पंच व सापळा पथकातील सदस्याने व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण व तक्रारदार श्री.अब्रार पटेल यांचे लाचमागणी पडताळणी जिल्हा परिषद कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे झालेली असुन त्यामध्ये तक्रारदार व अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण यांचे झालेले संभाषण त्यात तक्रारदार श्री.अब्रार पटेल म्हणाले सरजी नमस्कार,अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण म्हणाले नमस्कार तक्रारदार श्री.अब्रार पटेल त्यांना म्हणाले नई ते तर हाय, अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण म्हणाले तु कुठहे ते सांग, तेव्हा तक्रारदार u श्री.अब्रार पटेल त्यांना म्हणाले अं पैशे, अभि.कथित लोकसेवक श्री. चव्हाण म्हणाले पैशे हाना मग त्यांना तेच पाहिजेना तुला माला काही नई पाहीजेना पण समोरच्याला पाहिजेना:, तेव्हा तक्रारदार श्री.अब्रार पटेल म्हणाले, सर मग सर आता किती लागन त्याला तुम्ही सांगा आता, तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण,म्हणाले सांगितलना तुला कालच सांगितलना तुला किमान जी त्यांची, तेव्हा तक्रारदार श्री. अब्रार पटेल म्हणाले सात हजार अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण म्हणाले चौदा दोघांचे हे ना,. तक्रारदार श्री. अब्रार पटेल म्हणाले दोघांचे चौदा हजार, तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण म्हणाले आ ते लागनच ना आता.



Scanned with OKEN Scanner

तक्रारदार श्री.अब्रार पटेल म्हणाले सात हजार जास्त होत्यान सर काही डिस्काऊट माराना तुमच्या हातानी, तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण म्हणाले सहा दे चल बारा दे तुमचा दोघांचा विषय क्लोज, . तक्रारदार श्री.अब्रार पटेल म्हणाले नई शेवट फाईनल नई नई पाच हजार मधी आता फक्त एकच तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री. चव्हाण म्हणाले नई नई जमणार मित्रा मी त्याच्यामध्ये जे माला भेटणार हे, तक्रारदार श्री.अब्रार पटेल म्हणाले हावना हावना करायच असत सर पाच हजार मधी, तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण म्हणाले नई होणार, . तक्रारदार श्री.अब्रार पटेल म्हणाले आमच्या साठी एवढे दोन डॉक्युमेंट फक्त आमचे नंतर वाटल्यास मी तुम्हाला, तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण म्हणाले ये घेवून ये घेवून चल तुझ काय नाव हे, तक्रारदार श्री.अब्रार पटेल म्हणाल दोघांचे दहा हजार रुपये तेव्हा अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण म्हणाले तु पैशे दे तुझ काम करुन टाकतो, तक्रारदार श्री.अब्रार नसीर पटेल व अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण यांच्यामध्ये तक्रारदार श्री.अब्रार पटेल व त्यांचे मित्र विशाल बनसोड यांनी कौशलय विकास व्हॉकेशनल ट्रेनीग सेंटूर हिवरा ता.फलंब्री जि.छत्रपती येथे कन्स्ट्रक्शन सुपरवायझर हा कोर्स सन 2025 यावर्षी पुर्ण केला आहे. सदर कोर्सच्या आधारावर तक्रारदार व त्यांचे मित्र विशाल बनसोड यांनी जिल्हा परिषद बांधकाम विभाग अंतर्गत निघणारे शासकीय कामे यांची गुत्तेदार/ठेकेदार मिळणेकरीता जिल्हा परिषदर बांधकाम विभाग येथे कंन्सट्रक्शन सुपरवायझर/ बिल्डींग मेंटेनन्स चे नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी अभि.कथित लोकसेवक श्री. चव्हाण यांनी ते काम करत असलेले जिल्हा परिषद कार्यालय बांधकाम विभाग येथील वरिष्ठाचा प्रभाव पाडुन तक्रारदार यांचे सदरचे काम करून देण्यासाठी प्रत्येक फाईलचे 7,000/-रू याप्रमाणे दोन फाईलचे 14,000/- रूपये लाचेची मागणी पंचासमक्ष करून तडजोडी अंती प्रत्येक फाईलचे 5,000/- रूपये याप्रमाणे दोन फाईलचे 10,000/-रूपये लाचेची रक्कम स्वीकारण्यास मान्य केले असल्याचे निष्पण झाले.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार व तक्रारदार यांचे मित्र विशाल बनसोड व दोन्ही पंचांना अभि.कथित लोकसेवक श्री. चव्हाण यांचेविरुध्द लागलीच लाचेचा सापळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगीतले तसेच वेळे अभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. अब्रार नसीर पटेल व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी असले बाबत खात्री करुन दिली. नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. सदर फिंयाद मोठी असल्याने उर्वरीत फिंयाद पुढील पानावर..

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sunil baburao mane(I (Inspector)) / pi **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charg**
**Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): sunil baburao m

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): pi



Scanned with OKEN Scanner

**एफ आय आर पान क्र 5 पासुन उर्वरीत फिर्याद.**

आम्ही त्यानंतर तक्रारदार यांना सापळा करवाईसाठी लागणारे 10,000/-रु हजर करण्याचे सांगितले तेव्हा त्यांनी 500/-रु दराच्या 20 नोटा आमच्या समक्ष हजार केल्या, सदर नोटांचे नंबर व वर्णन पंच क्रमांक-2 श्री. प्रणव लहाने यांचे करवी नमुद करुन घेतले व त्यास पोअं/बारसे यांनी ऍंथ्रासिन पावडर लावुन लाचेच्या नोटा तक्रारदार श्री.अब्रार पटेल यांचे शर्टच्या समोरील डाव्या बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. आम्ही तक्रारदार यांना अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेल्या लाच रकमेच्या नोटा 10,000/-रु. काढुन अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण यांना द्याव्यात व त्यानंतर पाठीवर असलेली शाक (पिशवी) हाता मध्ये घ्यावी असा इशारा नेमुन दिला. त्यानंतर तक्रारदार श्री.अब्रार पटेल, तक्रारदार यांचे मित्र विशाल बनसोड, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांना त्यांचे पाठीवरील शाक (पिशवी) हाता मध्ये घेण्याचा इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर सुरक्षीत ठिकाणाहुन पंचांसमक्ष सापळा कारवाईचे अनुषंगाने आमच्या आदेशाने पो.अ.नंदिले यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये SanDisk कंपनीचे 16 जी.बी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 13:28 वा चालु करुन ते तक्रारदार श्री.अब्रार पटेल यांचे गळयात अडकवुन तक्रारदार श्री.अब्रार पेटल व त्यांचे मित्र विशाल बनसोड तसेच पंच क्रं 1. श्री. सोमेश्वर नरबदे यांना सापळा कारवाई कामी त्यांचे कडील मोटार सायकल क्रमांक MH-20 HA-6484 अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण यांची भेट घेणे कामी जिल्हा परिषद कार्यालय बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ मी सोबत पंच क्रं. 2 व सापळा पथक असे आमचेकडील खाजगी वाहनाने जिल्हा परिषद कार्यालय बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे आडोशाला जावुन तक्रारदार नजरेत राहील अशा रितीने थांबलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 हे अभि.कथित लोकसेवक श्री.नंदकिशोर चव्हाण यांची भेट घेण्यासाठी बांधकाम विभाग जिल्हा परिषद कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे जातांना दिसले. त्यानंतर तक्रारदार हे अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण यांचे सह जिल्हा परिषद कार्यालय बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर परिसरात चर्चा करतांना दिसले. तक्रारदार यांनी पथकास दिसेल अशा रितीने त्यांनी त्यांचे पाठीवरील पिशवी हातामध्ये घेऊन अभि.कथीत लोकसेवक श्री.चव्हाण याने पैसे स्विकारल्याचा 13:42 वा नियोजीत इशारा केला. सदर इशारा समजुन आम्ही, पंच क्रं.2 व सापळा पथक सक्रीय होवुन आम्ही तक्रारदारास सोबत घेवुन अभि.कथित लोकसेवक चव्हाण, यांना जिल्हा परिषद कार्यालय छत्रपती संभाजीनगर परिसरातुन ताब्यात घेतले. त्यानंतर लागलीच तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण यांना ताब्यात घेऊन बांधकाम विभाग जिल्हा परिषद कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथील ते बसत असलेल्या टेबलवर घेऊन तेथे त्यांना बसण्यात आले. त्यानंतर आम्ही

Scanned with OKEN Scanner

सर्व सापळा पथक, तक्रारदार व पंच क्रं. 2 यांचे समक्ष पंच क्र.1 यास सुरक्षीत ठिकाणावरुन निघाल्यापासुन ते नियोजीत इशारा होईपर्यंत काय घडले याबाबत विचारले असता, पंच क्र.1 याने सांगीतले की, मी व तक्रारदार तसेच विशाल बनसोडे असे अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण यांची बांधकाम विभाग जिल्हा परिषद कार्यालय छत्रपती संभाजीनगर घेण्यासाठी गेलो असता, ते जिल्हा परिषद कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथील परिसरात भेटले. त्यानंतर तक्रारदार श्री.अब्रार पटेल यांची व श्री.चव्हाण यांची कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण यांनी पैशाबाबत विचारुन लाचेची रक्कम स्वता: स्विकारली. त्यांनी ती त्यांच्या पॅन्टच्या मागील उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर तक्रारदाराने नियोजीत इशारा केला. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी देखील पंच क्र 1 यांनी दिलेल्या माहिती प्रमाणेच वरीलप्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉडर चालु करुन त्यामधील तक्रारदार, श्री. अब्रार पटेल आणि अभि.कथित लोकसेवक श्री. चव्हाण यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार अब्रार पटेल म्हणाले **नमस्कार सर** अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण म्हणाले **बोल चल बाहेर,** तक्रारदार अब्रार पटेल म्हणाले **हा,** अभि.कथित लोकसेवक श्री. चव्हाण म्हणाले **आमच्याकड जे जे आहे लायसन्स देण हे आमच्याकड हे मुख्य काम,** तक्रारदार श्री.अब्रार पटेल म्हणाले **म्हणजे तुमच्याकड स्पेशली,** अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण म्हणाले **हा लायसन्स देण हे मुख्य काम हे अन त्याच्या अनुषंगाने जे लिफाफ्याच असत ते एक वाटप आमच्याकड असती मग बाकीच्या गोष्टी मग तुम्हाला इतर ठिकाणी शोधावा लागन,** तक्रारदार श्री.अब्रार पटेल म्हणाले **ठिक हे सर कहीच विषय नई आमच द्या आता तेवढ काम करुन तेवढ ते लायसन्स तुमच्याच हाताने आम्हाला द्या,** अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण म्हणाले **हा लायसन्स तर आम्ही देणारच हे तुम्हाला काम तुम्हालाच शोधावा लागण,** तक्रारदार श्री.अब्रार पटेल म्हणाले **हे लगीच भेटून जाईन मग सरच काम हे दहा हजार मोजून घ्या सर,** असा तक्रारदार श्री.अब्रार पटेल व अभि.कथित लोकसेवक श्री.चव्हाण यांचे मध्ये झालेल्या संभाषणामध्ये आरोपी श्री.चव्हाण यांनी लाचमागणीची रक्कम स्विकारलेली आहे. यावरुन आरोपी श्री.चव्हाण यांनी तक्रारदार श्री.अब्रार नसीर पटेल व त्यांचे मित्र विशाल बनसोड यांचे जिल्हा परिषद बांधकाम विभाग अंतर्गत निघणारे शासकीय कामे यांची गुत्तेदार/ठेकेदार मिळणेकरीता जिल्हा परिषदर बांधकाम विभाग येथे कंन्सट्रक्शन सुपरवायझर/बिल्डींग मेंटेनन्स नोंदणी प्रमाणपत्र तयार करून देण्यासाठी बांधकाम विभाग जिल्हा परिषद कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथील वरिष्ठांचा प्रभाव पाडुन आरोपी श्री.चव्हाण यांनी तक्रारदार श्री.अब्रार पटेल यांचे कडुन लाचेची रक्कम 10,000/-रूपये स्वत: स्विकारल्याचे निष्पन्न झाले.

कर्तव्य अधिकारी
पोलीस ठाणे क्रांतीचौक
छ.संभाजीनगर (शहर)

त्यानंतर आम्ही पंचासमक्ष बांधकाम विभाग जिल्हा परिषद कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे बसवलेल्या इसमास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.नंदकिशोर आसाराम चव्हाण वय 61 वर्ष, सेवानिवृत्त कनिष्ठ सहाय्यक, पाणीपुरवाठा विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, छत्रपती संभाजीनगर रा.नवकार यश कॉमप्लॅक्स सी-वींग,प्लॅट क्रं.13, पोलीस कॉलनी, पडेगाव छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख करुन देवुन लाचेची रक्कम कोठे ठेवली याबाबत विचारले असता त्यांनी त्यांच्या पॅंटच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशा मध्ये ठेवल्याचे दिसून आले. तेव्हा सदरची लाचेची रक्कम पंच क्रं.2 यांचे मार्फतीने ताब्यात घेवुन सापळा पुर्व कारवाईवेळी तक्रारदार याचे कडे दिलेल्या नोटांच्या क्रमांकाची खात्री करता त्या त्याच क्रमांकाच्या नोटा असल्याचे दिसुन आले. तसेच पंचासमक्ष अल्ट्राव्हॉयलेट प्रकाशाचे उजेडात सदरच्या नोटा तपासल्या असता त्यावर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. सदरची लाचेची रक्कम, आरोपी श्री.नंदकिशोर चव्हाण यांनी अंगावर परिधान केलेल्या पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशात ठेवल्या असल्याने त्यांचे पॅन्टच्या पाठीमागील उजव्या बाजुच्या खिशावर अल्ट्राव्हॉयलेट प्रकाशाचे उजेडात पाहणी केली असता, त्यावर ठिक-ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यांनतर आरोपी श्री.नंदकिशोर चव्हाण यांचे कडुन लाचेची रक्कम 10,000/- रुपये व त्यांचे कडील मोबाईल ताब्यात घेतला तसेच तक्रारदार श्री.अब्रार नसीर पटेल व त्यांचे मित्र विशाल बनसोड यांची कंन्सट्रक्शन सुपरवायझर/ बिल्डींग मेंटेनन्स नोंदणी प्रमाणपत्र फाईल पंचासमक्ष संबंधीत टेबलवरून जप्त केले. तसेच आरोपी श्री.नंदकिशोर आसाराम चव्हाण यांना ताब्यात घेवुन त्यानंतर पुढील कारवाईकामी ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे येवुन पंचनामा पुर्ण केला आहे.

तरी दि. 25/02/2026 रोजी बांधकाम विभाग जिल्हा परिषद कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी यातील मुळ तक्रारदार श्री.अब्रार नसीर पटेल, वय 21 वर्ष, व्यवसाय व्यापार, रा- मदिना कॉलोनी नवीन तहसील कार्यालय समोर, फुलंब्री ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर.यांचे कंन्सट्रक्शन सुपरवायझर/ बिल्डींग मेंटेनन्स नोंदणी प्रमाणपत्र तयार करून देण्यासाठी आरोपी श्री.नंदकिशोर आसाराम चव्हाण वय 61 वर्ष, सेवानिवृत्त कनिष्ठ सहाय्यक, पाणीपुरवाठा विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, छत्रपती संभाजीनगर रा.नवकार यश कॉमप्लॅक्स सी-वींग,प्लॅट क्रं.13, पोलीस कॉलनी, पडेगाव छत्रपती संभाजीनगर यांनी ते काम करत असलेल्या बांधकाम विभाग जिल्हा परिषद कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथील वरिष्ठांचा प्रभाव पाडुन तक्रारदार श्री.अब्रार पटेल व त्यांचे मित्र श्री.विशाल बनसोड यांचे सदरचे काम करून देण्यासाठी प्रथम प्रत्येक फाईलचे 7,000/-रू रूपये प्रमाणे एकुण दोन फाईलचे 14,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. दिनांक 24/02/2026 रोजी दिलेल्या

Scanned with OKEN Scanner

तक्रारीवरून दिनांक 25/02/2015 रोजी लाचमागणी पडताळणी केली असता यातील आरोपी श्री.नंदकिशोर आसाराम चव्हाण यांनी तक्रारदार यांचे व त्यांचे मित्र श्री विशाल बनसोड यांच्या कंन्सट्रक्शन सुपरवायझर/ बिल्डींग मेंटेनन्स नोंदणी प्रमाणपत्र तयार करून देण्यासाठी प्रत्येक फाईलचे 7,000/-रू रूपये प्रमाणे एकुण दोन फाईलचे 14,000/- रुपये लाचेची मागणी पंचासमक्ष केली असून तडजोडी अंती प्रत्येक फाईलचे 5,000/- रूपये प्रमाणे असे दोन्ही फाईलचे 10,000/-रुपये लाचमागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लागलीच सापळा कारवाई दरम्यान जिल्हा परिषद कार्यालय, छत्रपती संभाजीनगर परिसरात सदरची लाच रक्कम आरोपी श्री.नंदकिशोर आसाराम चव्हाण वय 61 वर्ष, सेवानिवृत्त कनिष्ठ सहाय्यक, पाणीपुरवाठा विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, छत्रपती संभाजीनगर रा.नवकार यश कॉमप्लॅक्स सी-वींग,प्लॅट क्रं.13, पोलीस कॉलनी, पडेगाव छत्रपती संभाजीनगर यांनी स्वत: स्विकारली आहे. सबब आरोपी श्री.नंदकिशोर आसाराम चव्हाण वय 61 वर्ष, सेवानिवृत्त कनिष्ठ सहाय्यक, पाणीपुरवाठा विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, छत्रपती संभाजीनगर रा.नवकार यश कॉमप्लॅक्स सी-वींग,प्लॅट क्रं.13, पोलीस कॉलनी, पडेगाव छत्रपती संभाजीनगर यांनी ते काम करत असलेल्या कार्यालयातील वरिष्ठांचा प्रभाव पाडुन तक्रारदाराचे व त्यांच्या मित्राचे काम करून देतो म्हणुन लाचेची रक्कम स्वीकारली म्हणुन त्यांच्या विरोधात माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे कलम् 7 (अ) प्रमाणे सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा फिर्यादी जबाब मी संगणकावर टंकलिखीत केलेला असुन, तो मी वाचुन पाहीला असता बरोबर व खरा आहे.

फिर्याद दिली सही.